ePaper

|| वर्ष - 7 । अंक - 146 || UDYAM-MH-26-0158827 ||

महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com || मंगळवार, दिनांक 3 ऑक्टोबर 2023 || पिंपरी-चिंचवड आवृत्ती || mahaenews.com || maha_enews || Mahaenews

## “महाराष्ट्रात राजकीय भूकंप होणार”: चंद्रकांत खैरे



### आतील पानांत


- शिल्पांच्या माध्यमातून जनजागृती!
- शिल्पांच्या माध्यमातून जनजागृती!
- ऐश्वर्याच्या सौंदर्याला चॅलेंज नाहीच..!
- एशियाड: भारताला 7 पदके!


### सोसायटीची संरक्षण भिंत पडली : चिखलीमध्ये सुरु असलेल्या

# गृहप्रकल्पाचे काम धोकादायक?

### » सोसायटीचे झालेले नुकसान भरपाई करावी, अन्यथा काम थांबविण्याची रहिवाशांची मागणी

।पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**चिखलीमधील ऐश्वर्यम हमारा म्हाडा या सोसायटीच्या शेजारीच या एका इमारतीचे बांधकाम सुरू आहे. हे बांधकाम अतिशय असुरक्षितपणे सुरू असून, शेजारील सोसायटीची संरक्षण भिंत या सुरू असलेल्या बांधकामामुळे पडली. महानगर पालिकेच्या पाण्याची पाईपलाईन देखील यांमुळे खराब झालेली आहे. शिवाय पाण्याच्या टाकीला तडे गेलेले आहेत. या इमारतीच्या विकासकांवर तात्काळ कारवाई करावी, अशी मागणी येथील संतप्त रहिवाशांनी केलेली आहे.**





ऐश्वर्यम हमारा म्हाडा या सोसायटीचे विकासक सतीश अग्रवाल, आणि नरेंद्र अग्रवाल यांनी एका गृहप्रकल्पाचे काम चालू केलेले आहे. परंतु या गृहप्रकल्पाचे काम चालू करत असताना संबंधित विकासकांनी सुरक्षेच्या कोणत्याही नियमाचे पालन केलेले नाही. या ऐश्वर्यम हमारा म्हाडा सोसायटीची संरक्षक भिंत या चालू असलेल्या कामामुळे पडलेली आहे. तसेच या सोसायटीच्या पाण्याच्या टाकीला देखील तडे गेलेले आहेत.

#### ऐश्वर्यम हमारा म्हाडाचे काम देखील निकृष्ट दर्जाचे

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने दिलेली पाण्याची पाईपलाईन पूर्णपणे तुटलेली आहे. त्याचप्रमाणे या सोसायटीच्या बिल्डिंगलादेखील यापासून धोका निर्माण झालेला आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने घालून दिलेले सुरक्षिततेचे कोणत्याही नियम या बिल्डरकडून पाळले जात नाहीत. हा नागरिकांच्या जीवाशी खेळ आहे. या ऐश्वर्यम हमारा म्हाडा या सोसायटीचे काम देखील अतिशय निकृष्ट दर्जाचे केलेले आहे.

> “ संबंधित गृहप्रकल्पाच्या विकासकांनी हे काम त्वरित थांबवावे. तसेच या ऐश्वर्यम हमारा महाडा या सोसायटीची संरक्षक भिंत, तसेच पाण्याच्या टाकीला गेलेले तडे, तोडलेली पाईपलाईन या सर्व गोष्टी दुरुस्त करून द्याव्यात. तोपर्यंत हे काम चालू करू नये अन्यथा या कामामुळे होणाऱ्या कोणत्याही नुकसानीस, जीवित हानीस या प्रकल्पाचे विकासक जबाबदार राहतील. याबाबत आम्ही आमच्या फेडरेशनमार्फत पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त शेखर सिंग यांना कळविलेले आहे
>
> – **संजीवन सांगळे,** **अध्यक्ष, चिखली- मोशी- पिंपरी चिंचवड हाउसिंग सोसायटी फेडरेशन..**

---

# ‘महात्मा गांधी स्मारकाचे काम दोन महिन्यात सुरू करा!

### » इम्रान शेख : महात्मा गांधी यांच्या जयंतीचे औचित्य साधून राष्ट्रवादी युवकचे जोरदार आंदोलन

पिंपरी । प्रतिनिधी : महाईन्यूज

**संपुर्ण देश राष्ट्रपिता महात्मा गांधीजींची १५४ वी जयंती साजरी करत असताना पिंपरी चिंचवड शहरात अद्याप महात्मा गांधीजींचे स्मारक नसल्याचे सांगत राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या वतीने नियोजित महात्मा गांधीजींच्या स्मारकाच्या जागेवर आंदोलन केल गेले. शहराध्यक्ष तुषार कामठे, युवक शहराध्यक्ष इम्रान शेख महिला अध्यक्ष ज्योती निंबाळकर यांच्या नेतृत्वात हे आंदोलन केले गेले.**



राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहराध्यक्ष तुषार कामठे यांनी राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या आंदोलनास पाठिंबा देत भाजपच्या अनागोंदी कारभारावर जोरदार टीका केली. सत्ताधारी भाजपाला महात्मा गांधी यांच्या नावाची ॲलर्जी असून स्मारक बनविण्यासाठी जागा देण्यास टाळाटाळ केली होती. परंतु लोकांच्या मागणीमुळे जागा दिली असल्याची टीका करत स्मारकाचे काम त्वरित झाले पाहिजे, अशी मागणी कामठे यांनी केली. युवक शहराध्यक्ष इम्रान शेख म्हणाले नथुराम गोडसेला आदर्श मानणारे व त्याचे उदात्तीकरण करणाऱ्यांची सत्ता गेले पाच वर्षे या महापालिकेत होती.

#### तर जागेचा ताबा घेणार...

» गेल्या दहा वर्षापासून शहरातील गांधी प्रेमी यांच्या पाठपुराव्याला महापालिका सातत्याने केराची टोपली दाखवत असून आता यापुढे राष्ट्रवादी युवक काँग्रेस शांत बसणार नाही.येणाऱ्या तीन महिन्यात महापालिका आणि बिर्ला ग्रुप यांनी स्मारकाचे काम सुरू केले नाही तर शहरातील गांधीप्रेमी यांना घेऊन राष्ट्रवादी युवक काँग्रेस गांधीजींनीच दाखविलेल्या सविनय कायदेभंगाच्या मार्गाने जागेचा ताबा घेत लोक वर्गणीतून स्मारक उभे करण्याची भूमिका घेईल असा इशारा इम्रान शेख यांनी दिला. यावेळी कामगार नेते काशिनाथ नखाते, महिला अध्यक्ष ज्योती निंबाळकर, विद्यार्थ्याध्यक्ष राहुल आहेर, यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

# आदिवासींना ‘वनवासी’ संबोधून दिशाभूल!

## जल , जंगल आणि जमीन याचे मालक कोण : शरद पवार

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**जल ,जंगल आणि जमीन याचे मालक कोण तर या प्रश्नाचे उत्तर फक्त आदिवासी हे आहे. आदिवासी हे देशातील मूळ रहिवासी आणि मालक आहेत. सध्याचे राज्यकर्ते मूळ आदिवासींना वनवासी, नक्षलवादी म्हणून दिशाभूल करत आहेत, अशी टीका राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी केली. जुन्नर येथे आदिवासी चोथरा (काळा चबुतरा) अभिवादन दिनानिमित्त बिरसा ब्रिगेड आयोजित राष्ट्रीय आदिवासी आधिकार परिषदेत ते बोलत होते.**




पवार म्हणाले, देशात भाजपाचे सरकार आहे. राज्यात त्यांचे सहकारी काम करत आहेत. लोकांचे राज्य लोकांनी चालवावे, याबाबत तक्रार नाही. मात्र, राज्यात आदिवासी, शेतकरी, दलित यांच्या हिताकडे दुर्लक्ष करण्याची भाजपाची भूमिका आहे. हे सरकार आदिवासींना आदिवासी म्हणत नाही, तर वनवासी म्हणते. जल-जंगल-जमीन या पर्यावरणीय त्रिसूत्रीवर आदिवासी समाज काम करत आहे. आदिवासींच्या मूलभूत हककांसाठी देशात बिरसा ब्रिगेडचे काम सुरू आहे. त्यासाठी आम्ही आदिवासी बांधवांच्या सोबत नेहमीच आहे, असेही पवार म्हणाले. काँग्रेसचे महासचिव दीपक बाबरिया, पर्सनल लॉ बोर्डाचे सदस्य मौलाना सज्जद नुमानी, खासदार अमोल कोल्हे, आमदार किरण लहामटे, परिषदेचे स्वागताध्यक्ष आमदार अतुल बेनके, अशोक पवार, आमशा पाडवी, सुनील भुसारा, माजी आमदार राजू तोडसामा, विघ्नहर कारखान्याचे अध्यक्ष सत्यशील शेरकर, बीरसा ब्रिगेड सह्याद्री संघटनेचे अध्यक्ष काशिनाथ कोरडे, देवदत्त निकम, उद्योजक किशोर दांगट धनराज खोत, उज्वला शेवाळे आदी उपस्थित होते. बिरसा ब्रिगेडचे राष्ट्रीय अध्यक्ष सतीश पेंदाम म्हणाले की, धर्मनिरपेक्ष संविधान जिवंत राहिले पाहिजे. आदिवासी मुक्त राष्ट्र म्हणजे हिंदुराष्ट्र असा समज समाजात पसरविला जात आहे. या देशाचे मूळ मालक असलेल्या आदिवासी समाजाने हक्कांसाठी आंदोलन केले तर त्यांना नक्षलवादी ठरविले जात आहे. बिरसा ब्रिगेड आणि इतर आदिवासी संघटनांचे नेतृत्व पवार यांच्याकडे आहे. आता देशातील सर्व आदिवासी एकत्र होत असून आपणही एकजुटीने रहावे. आद्य क्रांतिकारक बिरसा मुंडा यांचे भव्य स्मारक उभारण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. आदिवासींसाठी असलेल्या स्वतंत्र अर्थसंकलपातील तरतुदी कमी होता कामा नयेत. आदिवासींच्या हक्कांबाबत शासनाने चुकीची भूमिका घेतल्यास आमदारकीचा राजीनामा देणारा मी पहिला आमदार असेल, असे आमदार अतुल बेनके यांनी सांगितले.

### बिरसा मुंडा यांचे स्मारक उभारणार

» बिरसा ब्रिगेडचे राष्ट्रीय अध्यक्ष सतीश पेंदाम म्हणाले की, धर्मनिरपेक्ष संविधान जिवंत राहिले पाहिजे. आदिवासी मुक्त राष्ट्र म्हणजे हिंदुराष्ट्र असा समज समाजात पसरविला जात आहे. या देशाचे मूळ मालक असलेल्या आदिवासी समाजाने हक्कांसाठी आंदोलन केले तर त्यांना नक्षलवादी ठरविले जात आहे. बिरसा ब्रिगेड आणि इतर आदिवासी संघटनांचे नेतृत्व पवार यांच्याकडे आहे. आता देशातील सर्व आदिवासी एकत्र होत असून आपणही एकजुटीने रहावे. हे सरकार आदिवासींना आदिवासी म्हणत नाही, तर वनवासी म्हणते. जल-जंगल-जमीन या पर्यावरणीय त्रिसूत्रीवर आदिवासी समाज काम करत आहे. आदिवासींच्या मूलभूत हककांसाठी देशात बिरसा ब्रिगेडचे काम सुरू आहे. त्यासाठी आम्ही आदिवासी बांधवांच्या सोबत नेहमीच आहे, असेही पवार म्हणाले.

# देशात नव्हे जगभरात गांधीजींचे नाव!

## सध्या नेत्यांचा भरोसा राहिलेला नाही : आढाव

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**देशाला इंडिया म्हणायचं की भारत की हिंदू राष्ट्र यावरून सध्या देशात वाद सुरू आहे. हा महत्वाचा प्रश्न आहे का? असा प्रश्न ज्येष्ठ कामगार नेते बाबा आढाव यांनी उपस्थित केला आहे. ते पुण्याच्या दापोडीमध्ये भारतीय भटक्या विमुक्त प्रतिष्ठानच्या कार्यक्रमात बोलत होते. यावेळी त्यांच्या हस्ते राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला. बाबा आढाव यांनी विविध प्रश्नांवर बोट ठेवत वास्तव मांडलं.**



गोडसे यांचे कितीही नाव घेतलं तरी जगभरात गांधीजींचं नाव आहे. तुम्ही याला काय कराल असा प्रश्न देखील त्यांनी सत्ताधाऱ्यांना विचारला आहे. बाबा आढाव म्हणाले, देशाला इंडिया म्हणायचं की भारत म्हणायचं की हिंदु राष्ट्र यावरून वाद सुरू आहे. हे महत्त्वाचे प्रश्न आहेत का? तरुण आरक्षणाच्या पाठीमागे लागले आहेत. रोजगार मिळत नाही, महाराष्ट्रावर दुष्काळाचं सावट आहे. पुढे ते म्हणाले, सध्या राजकारणात भटक्या आणि विमुक्तांचा सुळसुळाट झाला आहे तुम्ही जातीवाले बाजूला झाले आहात. नेते कुठून कुठे जातील हे काही सांगता येत नाहीत. सकाळी कुठे असेल आणि संध्याकाळी कुठे असेल हे सांगता येत नाही. त्यांना सत्तेची भूक आहे. त्यांना मान पाहिजे. पुढे ते म्हणाले, आज तुम्ही कितीही गोडसेंच नाव घ्या. पण दुनिया गांधींचं नाव घेते आहे. याला

### देशाला इंडिया म्हणायचं की भारत

» देशाला इंडिया म्हणायचं की भारत म्हणायचं की हिंदु राष्ट्र यावरून वाद सुरू आहे. हे महत्त्वाचे प्रश्न आहेत का? तरुण आरक्षणाच्या पाठीमागे लागले आहेत. रोजगार मिळत नाही, महाराष्ट्रावर दुष्काळाचं सावट आहे. पुढे ते म्हणाले, सध्या राजकारणात भटक्या आणि विमुक्तांचा सुळसुळाट झाला आहे तुम्ही जातीवाले बाजूला झाले आहात. नेते कुठून कुठे जातील हे काही सांगता येत नाहीत.

# कामगारांच्या प्रश्नी सुनील शेळके आक्रमक; म्हणाले, एक काय चार कंपन्या बंद पडल्या...

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

पुण्याच्या मावळमधील तळेगाव एमआयडीसी येथील जनरल मोटर ही कंपनी बंद पडली असून यामुळे हजारो कामगारांचा रोजगाराचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्या कंपनीच्या जागी ह्युंदाई कंपनी सुरू झाली आहे. परंतु, संबंधित कामगारांना कामावर घेण्याबाबत संभ्रम आहे.

यामुळेच हजारो कामगार रस्त्यावर उतरले होते. यावेळी मावळचे आमदार सुनील शेळके यांनी ह्युंदाई कंपनीच्या पदाधिकाऱ्यांना इशारा देत दहा तारखेच्या आत कामगारांना कामावर न घेतल्यास तळेगाव एमआयडीसी ठप्प करण्याचा इशारा दिला आहे. कंपनी बंद पडली तरी चालेल भूमिपुत्रांच्या नोकरीचा प्रश्न मिटला पाहिजे, अशी भूमिका शेळके यांनी घेतली आहे. सुनील शेळके म्हणाले, सरकार तुमच्याकडे गांभीर्याने बघत नाही. अनेक मंत्र्यांसोबत बैठका झाल्या. आता बैठका किती आणि कोणाकडे लावायच्या? हादेखील प्रश्न पडलेला आहे.

काहीतरी निर्णय येईल म्हणून तुम्ही कामगार आमच्याकडे अपेक्षेने पाहत असता. आज तुमचा संयम सुटल्याने राष्ट्रपिता महात्मा गांधींच्या जयंती दिवशी रस्त्यावर उतरलात. मी सत्तेत आहे, म्हणून सत्तेची बाजू घेत नाही. वस्तुस्थिती सरकारने स्वीकारली पाहिजे. कामगारांचे म्हणणं सरकारने ऐकलं पाहिजे. जनरल मोटर कंपनी बंद झाल्यानंतर ह्युंदाई कंपनीने काम सुरू केलं. जनरल मोटार आणि ह्युंदाईच्या एमडीला मी सांगतो. आमचा कंपनीला विरोध नाही. त्यांचं स्वागतच आहे. जोपर्यंत भूमिपुत्रांच्या कामांचा प्रश्न मिटत नाही. तोपर्यंत कुठलंही काम कंपनीत करता येणार नाही.

# शिल्पांच्या माध्यमातून जनजागृती!

## आमदार महेश लांडगे यांची विधायक संकल्पना

### भोसरीत कुस्ती केंद्र, गावजत्रा मैदान परिसराचे सुशोभिकरण







। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**भोसरी विधानसभा मतदार संघातील आंतरराष्ट्रीय कुस्ती प्रशिक्षण केंद्र व भोसरी गावजत्रा मैदान परिसरात येथे ग्रामसंस्कृती, पारंपरिक क्रीडा प्रकार यासह बैलगाडा शर्यत अशी आकर्षक शिल्प उभारण्यात येणार आहेत. त्याचे काम अंतिम टप्प्यात आले असून, आमदार महेश लांडगे यांच्या संकल्पनेतून हे काम हाती घेण्यात आले आहे.**

पिंपरी-चिंचवड महापालिका प्रभाग क्रमांक ७ येथील भोसरी स्मशान भूमी ते अग्निशामक केंद्रापर्यंतचा रस्ता अद्ययावत पद्धतीने विकसित करण्यात येत आहे. भाजपा आमदार महेश लांडगे यांच्या संकल्पनेतून या ठिकाणी आंतरराष्ट्रीय दर्जाचे कुस्ती प्रशिक्षण केंद्र, आंतरराष्ट्रीय दर्जाचे कबड्डी संकूल उभारण्यात आले आहे. तसेच, भोसरी स्मशानभूमीचेही नूतनीकरण यापूर्वीच झाले आहे.

विशेष म्हणजे, या भागात भारतीय संस्कृती आणि शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याचा खेळ असलेला परंपरागत बैलगाडा घाट आहे. राज्यातील बैलगाडा शर्यतींवरील बंदी उठवण्यासाठी आमदार लांडगे यांनी सर्वोच्च न्यालयात यशस्वी लढा दिला. त्यानंतर राज्यातील बैलगाडा शर्यती सुरू झाल्या. ई- क्षेत्रीय कार्यालयाचे कार्यकारी अभियंता देवेंद्र बोरावके म्हणाले की, महाराष्ट्राची ग्रामसंस्कृती, बैलगाडा शर्यत यासह कुस्तीसारख्या मर्दानी खेळाबाबत नव्या पिढीत जनजागृती व्हावी. आपली शेती-माती आणि संस्कृतीबाबत अभिमान निर्माण व्हावा. या करिता या रस्त्याच्या सुशोभिकरणात विविध शिल्प उभारण्याची सूचना करण्यात आली होती. लवकरच या प्रकल्पाचे काम पूर्ण होणार आहे.



"महाराष्ट्राची ग्रामसंस्कृती, बैलगाडा शर्यत, कुस्ती, कबड्डी, योगमुद्रा अशा विविध शिल्पांमुळे सर्वसामान्य नागरिकांमध्ये जनजागृती आणि विधायक संदेश जाईल. या संकल्पनेतून भोसरी गावजत्रा मैदान परिसर, तसेच स्मशान भूमी ते अग्निशामक केंद्रापर्यंतच्या रस्त्याचे काम करताना सुशोभिकरण करावे, अशी सूचना केली होती. त्यानुसार शिल्पाचे काम प्रगतीपथावर आहे. आपली संस्कृती, लाल मातीतील आपले खेळ याबाबत प्रत्येकाला अभिमान पाहिजे.

- **महेश लांडगे,** आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा.

---


# कर संकलन विभागाचा 'मास्टरस्ट्रोक'

## सहा महिन्यांत 60 टक्के मालमत्तांचा कर वसूल: इतिहासात 580 कोटींची विक्रमी वसुली!

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या कर संकलन व कर आकारणी विभागाने पालिकेच्या आत्तापर्यंतच्या इतिहासात प्रथमच सहा महिन्यांत विक्रमी अशी कर वसुली केली आहे. सहा महिन्यांत 60 टक्क्यांपेक्षा जास्त करदात्यांकडून तब्बल 580 कोटी रुपयांचा कर वसूल करण्यात यश मिळविले आहे. दुसरीकडे वारंवार आवाहन करूनही कर न भरणाऱ्या मालमत्ता धारकांना आजपासून दोन टक्के विलंब शुल्क लागू होणार आहे. तर थकबाकीदारांच्या मालमत्ता जप्त करण्यासाठी तीव्र मोहीम हाती घेण्यात येणार आहे.**





दरम्यान, गतवर्षी सप्टेंबर अखेरपर्यंत 2 लाख 45 हजार 844 मालमत्ता धारकांनी 364 कोटींचा तर यंदा सप्टेंबर अखेरपर्यंत 3 लाख 66 हजार 636 मालमत्ता धारकांनी 579 कोटी रुपयांचा कर भरला आहे. म्हणजे गतवर्षीपेक्षा 1 लाख 20 हजार 792 मालमत्ता धारकांनी सहा महिन्यांत कराचा भरणा केला आहे. शहरात निवासी, औद्योगिक, बिगर निवासी, मिश्र, मोकळ्या जमीन अशा 6 लाख 7 हजार नोंदणीकृत मालमत्ता आहेत. या मालमत्ता धारकांकडून महापालिकेच्या कर संकलन व कर आकारणी विभाग कर वसूल करत आहे. गतवर्षी या विभागाच्या वतीने राबविलेल्या विविध उपक्रम, जनजागृती, जप्ती मोहीम, मालमत्ता धारकांना नोटीसा, नळ कनेक्शन बंद करणे, थकबाकीदारांची वृत्तपत्रात नावांची यादी प्रसिद्ध करणे यासह यंदा महिला बचत गटांच्या माध्यमातून बिलांचे घरपोच वाटप, रिक्षाव्दारे जनजागृती, महत्त्वाच्या चौकात होर्डिंग्ज, रिल्स स्पर्धा, सोशल मीडियाचा प्रभावी वापर याचबरोबर प्रत्येक व्यक्तीला त्याची मालमत्ता कराची रक्कम आणि सवलतीची रक्कम सांगणारा CUSTOMISED SMS पाठवला जात होता. अशा विविध बाबींमुळे 2023-24 च्या पहिल्या सहामाहीत 580 कोटी रुपयांचा कर वसूल करण्यात विभागाला यश आले आहे.

6 लाख 7 हजार मालमत्ता धारकांपैकी 3 लाख 66 हजार 636 मालमत्ता धारकांनी म्हणजे 60 टक्के मालमत्ता धारकांनी विविध कर सवलतींचा लाभ घेत सहा महिन्यांत कराचा भरणा केला आहे. या मालमत्ता धारकांनी 579 कोटी 62 लाख 62 हजार रुपयांचा कर महापालिका तिजोरीत जमा केला आहे.



"महापालिकेच्या कर संकलन व कर आकारणी विभागाने यंदा मालमत्ता करांची बिले वाटप महिला बचत गटांतील महिलांना देण्याचे ठरवले होते. याला प्रकल्प सिद्धी असे नाव देण्यात आले. हा निर्णय महिला बचत गटांनी सार्थ ठरविला आहे. महिलांनी शंभर टक्के बिलाचे वाटप केले. त्यामुळे नागरिकांनी पहिल्या सहामाहीत कर भरण्यास प्राधान्य दिले. मालमत्ता नोंद अभियानाने वेग घेतला आहे. यातही शहरातील महिला बचत गटातील महिलांना मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध करून दिला आहे. नागरिकांनी आपल्या मालमत्तांची अचूक नोंद होण्यासाठी या अभियानाला प्रतिसाद द्यावा.

- **शेखर सिंह ,** आयुक्त पिंपरी चिंचवड महानगरपालिका



"सहा महिन्यांत 60 टक्यांपेक्षा जास्त मालमत्ता धारकांनी आपल्या कराचा भरणा केला आहे. त्यामुळे आता आर्थिक वर्षातील 6 महिन्यात उर्वरित 40 टक्के मालमत्ता धारकांकडून कर संकलन करण्यासाठी लक्ष केंद्रित केले जाणार आहे. यामध्ये प्रामुख्याने अनेक वर्षांपासून थकीत असलेला कर वसूल आणि चालू कर 100 टक्के वसुली करणे हेच विभागाचे एकमेव ध्येय असणार आहे. यासाठी मालमत्ता जप्त करण्यासारखा कटू निर्णय घ्यावा लागला आहे.

- **नीलेश देशमुख,** सहायक आयुक्त पिंपरी चिंचवड महानगरपालिका

# मध्य प्रदेशातील 'येडियुरप्पा'?




**मध्य प्रदेशच्या विधानसभा निवडणुकीसाठी तिघा केंद्रीय मंत्र्यांसह सात खासदार भाजपने रिंगणात उतरवले आहेत. भाजपच्या या कथित धोरणीपणातून दोन-तीन गोष्टी स्पष्ट झाल्या. पूर्वी निवडणूक विधानसभेची असो वा लोकसभेची, भाजपने दगडालादेखील उभे केले तरी तो निवडून येईल असे गमतीने म्हटले जायचे. त्यामागे मोदी नावाभोवती असणारा आत्मविश्वास हे एकमेव कारण होते.**

भाजपला उमेदवाराकडे बघून मते मिळत नाहीत तर पंतप्रधान नरेंद्र मोदींकडे बघून लोक मते देतात, असे भाजपचे नेते सांगत असत. कर्नाटकमधील पराभवानंतर हा आत्मविश्वास गायब झाला. भाजपच्या दगडाला मते मिळत नाहीत. त्या दगडाला मोदीही वाचवू शकत नाहीत. मोदींची एकहाती विधानसभा निवडून देण्याची क्षमता पूर्वीसारखी राहिली नाही, ही बाब कर्नाटकने अधोरेखित केली. ही भीती मध्य प्रदेशच्या विधानसभा निवडणुकीत खरी ठरली तर काय करणार, असा विचार भाजपच्या केंद्रीय निवडणूक समितीच्या सदस्यांच्या मनात आला असावा. त्यामुळे भाजपने मध्य प्रदेशमध्ये पश्चिम बंगालच्या प्रयोगाची पुनरावृत्ती करण्याचा निर्णय घेतला असावा. भाजपने इथे खासदारांना आमदारकी जिंकण्यासाठी पाठवले होते. मध्य प्रदेशात कैलाश विजयवर्गीय यांच्यासारख्या राष्ट्रीय




स्तरावरील नेत्याला पक्षाने पुन्हा राज्यात पाठवून तिथे आमदारकीची निवडणूक लढवणे भाग पाडले आहे. केंद्रीय कृषिमंत्री नरेंद्र तोमर वा केंद्रीय अन्नप्रक्रियामंत्री प्रल्हाद पटेल, केंद्रीय ग्रामविकास राज्यमंत्री फग्गन सिंह कुलस्ते या तिघांना विधानसभेची निवडणूक लढण्यास सांगण्यात आले आहे. या तीन-चार नावांची घोषणा झाली, तेव्हा या नेत्यांनाही आश्चर्याचा धक्का बसला. कैलाश विजयवर्गीय हे अमित शहांचे विश्वासू आहेत, त्यांना पश्चिम बंगालची जबाबदारी दिली होती, तिथे भाजपला अपेक्षित यश मिळाले नाही. मग हे विजयवर्गीय भाजपमध्ये अधांतरी राहिले. त्यांच्याकडे कोणतीही जबाबदारी दिली गेली नाही. शहांचा माणूस ही ओळख कायम राहिल्याने त्यांची राष्ट्रीय कार्यकारिणीतून हकालपट्टी करण्याचे धाडस नड्डा यांनी दाखवले नाही. विजयवर्गीय महासचिवपदी कायम राहिले; पण त्यांचा उपयोग कसा करून घ्यायचा हा प्रश्न पक्षासमोर होता. अखेर त्यांना इंदूरमधून विधानसभा निवडणूक लढवण्याचा आदेश काढला गेला. दहा वर्षांत ते राज्यात फिरकलेले नाहीत. ते दिल्लीत-लोकसभेत राहिले. आता नाइलाजाने, भाजपच्या केंद्रीय नेतृत्वाच्या नावाने बोटे मोडत विजयवर्गीय बाइकवरून प्रचार करत फिरत आहेत. विजयवर्गीय यांच्याकडे बघितले की, मध्य प्रदेशामध्ये नव्या पिढीतील नव्या चेहऱ्यांना उमेदवारी देण्यात भाजपला अपयश आल्याचे उघड होते. भाजपमध्ये खासदार असो वा आमदार वा अन्य कोणी, त्यांच्या पसंती वा नापसंतीचा प्रश्न उद्भवत नाही. कदाचित नरेंद्र तोमर विधानसभेची निवडणूक लढवण्यासाठी उत्सुक असू शकतील. विद्यमान मुख्यमंत्री शिवराज चौहान यांच्यावर मोदी-शहांनी अनिश्चिततेची टांगती तलवार कायम ठेवल्याने आपल्याला मुख्यमंत्रीपदाची संधी मिळू शकते, असे तोमर यांना वाटू शकते. ग्वाल्हेर-चंबळ खोऱ्यात भाजप आणि काँग्रेसचे तुंबळ युद्ध होण्याची शक्यता आहे. तोमर याच चंबळ खोऱ्यातून येतात, तिथे भाजपने बाजी मारली तर विजयाचे श्रेय तोमर यांना मिळू शकते. तोमर हे मोदी-शहांना हवे तसे शांत कार्यकर्ते आहेत. ते कधीही पुढे पुढे करत नाहीत, ते दिलेले काम नीट करतात. वादग्रस्त कृषी कायद्यांमुळे मोदी माफी मागेपर्यंत तोमर किल्ला लढवत राहिले. बाकी अन्य दोन मंत्री आणि खासदारांची परिस्थिती तोमर यांच्यापेक्षा वेगळी नाही. पक्षाच्या नेतृत्वाने दिलेल्या आदेशाचे पालन करणे एवढेच त्यांचे काम असल्याने उघडपणे नाराजी व्यक्त न करता ते कामाला लागलेले आहेत. फक्त विजयवर्गीय यांनी आपल्या कार्यकर्त्यांसमोर नाराजी व्यक्त केली. विधानसभा निवडणुकीत दोन-चार प्रचारसभा घेण्याचे त्यांनी ठरवले होते. विमानातून जायचे, लोकांसमोर भाषण द्यायचे की काम झाले असे त्यांना वाटत होते. पण त्यांचे मनसुबे मोदी-शहांनी उधळून लावले. त्यांनी विजयवर्गीय यांना स्वतःच्या प्रचारासाठी विमानातून नव्हे तर मोटरसायकलवरून प्रवास करणे भाग पाडले आहे. खासदारांना आमदारकीच्या निवडणुकीत उतरवणे म्हणजे पक्षाकडे सशक्त उमेदवारांची वानवा असल्याचे लक्षण. पश्चिम बंगालमध्ये लॉकेट चटर्जी, स्वपन दासगुप्ता वगैरे काही खासदारांना भाजपने मैदानात उतरवले होते, पण ही रणनीती फारशी यशस्वी झाली नव्हती.

## संपादकीय »

# विसर्जन कशाचे?

***गणेश विसर्जन मिरवणूक जनतेस दोन दिवस वेठीस धरते, मग 'ईद' मिरवणुकांनी एखादा दिवस आणखी गैरसोय वाढवली तर काय बिघडले***

एके काळी 'ऑक्सफर्ड ऑफ द ईस्ट' असे बिरुद मिरवणाऱ्या पुण्यातील गणेश विसर्जन मिरवणूक यंदा ३०-३२ तास चालली. मुंबईकरांनी यासाठी २८ तास घेतले. म्हणजे निदान या मुद्द्यावर तरी मुंबईकरांवर पुण्याने मात केली. नाशिक, कोल्हापूर, नागपूर, औरंगाबाद वगैरे शहरांत इतका नाही पण असाच प्रदीर्घ काळ हा विसर्जन सोहळा सुरू होता. त्याच्या दुसऱ्याच दिवशी इद-ए-मिलाद उन नबीच्या भव्य मिरवणुका निघाल्या. हा इस्लामचे प्रेषित महंमद पैगंबर यांचा जन्मदिन. तो इद-ए-मिलाद म्हणून साजरा होतो. वास्तविक इस्लामिक संस्कृतीत प्रेषिताचा जन्मदिन साजरा करण्याची प्रथा नाही. कुराण आणि सुन्नाच्या मते तर ईद-उल-फित्र आणि ईद-ए-अद्धा या दोन पवित्र दिनांखेरीज अन्य काही साजरे करण्यास धर्मसांस्कृतिक आधार नाही. म्हणजे जे काही या दिनी अलीकडे होऊ लागले आहे त्याचे वर्णन धार्मिक नावीन्य असे करता येईल.

**कॅनडाचे पंतप्रधान जस्टिन ट्रुडो यांनी शीख दहशतवादी हरदीप सिंग निज्जर याच्या हत्येमध्ये भारत सरकारच्या 'हस्तकां'चा सहभाग असल्याचा गंभीर आरोप केल्यानंतर, भारत-कॅनडा संबंध कमालीचे बिघडले आहेत. अलीकडच्या काळात एका मोठ्या लोकशाही देशाच्या निर्वाचित प्रमुखाने दुसऱ्या मोठ्या लोकशाही देशाविरुद्ध अशा प्रकारचा आरोप केल्याचे उदाहरण दुसरे सापडणार नाही.**

# अमेरिकेच्या 'मध्यस्थी' नंतर....!

एका विशिष्ट समुदायाला भारत आणि कॅनडा हे दोन्ही देश विद्यमान भूसामरिक आणि भूराजकीय परिप्रेक्ष्यात एकाच गोटातले वाटतात. युक्रेन युद्ध आणि लोकशाहीविरोधी चीनचा विस्तारवाद या दोन घडामोडींमुळे जगाची जी वैचारिक विभागणी झालेली आहे तीत एका बाजूस अमेरिका, पश्चिम युरोपसह कॅनडाही आहे. हे सर्व देश जगातील सर्वात मोठ्या लोकशाही देशाला, अर्थात भारताला नैसर्गिक सहकारी मानतात. भारताच्या परराष्ट्र धोरणात अशा प्रकारची ठसठशीत विभागणी मंजूर नाही. त्यामुळे अमेरिकेने पुढाकार घेऊन बनवलेल्या काही गटांमध्ये भारत सहभागी असला तरी रशियाशी पूर्ण काडीमोडही भारताने घेतलेला नाही. या 'परिघावरील मित्रदेशा'बाबत त्यामुळेच गंभीर आरोप करण्याचे धाडस कॅनडाने केले असावे. आणि तरीही या आरोपानंतर भारताविरुद्ध कॅनडाचे मित्रदेश – विशेषतः 'फाइव्ह आइज'



गुप्तवार्ता देवाण-घेवाण करारातील सहकारी म्हणजे अमेरिका, ब्रिटन, ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंड एकत्र येऊन भारतावर दडपण आणतील, ही भीती अनाठायी ठरली आहे. कदाचित शत्रूच्या मोठ्या पापांपेक्षा मित्रांची किरकोळ 'पातके' हलक्याने घेण्याचा व्यवहारीपणा दाखवण्याखेरीज सशक्त पर्याय अमेरिकेसमोरही उपलब्ध नाही. शिवाय कॅनडात ट्रुडोंना शीख मतदारांची जेवढी गरज भासते, तितकीच किंबहुना त्यापेक्षा अधिक गरज अमेरिकेतील दोन प्रमुख राजकीय पक्षांना शीखेतर भारतीय मतदारांची भासणार आहे. दोन्ही देशांमध्ये पुढील वर्षी निवडणुका होत आहेत, हे वास्तव नजरेआड करण्यासारखे नाही. या पार्श्वभूमीवर परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांच्या अमेरिका शिष्टाईदौऱ्याकडे पाहावे लागेल. त्यांच्या कार्यक्रम पत्रिकेवर सप्टेंबर महिन्यातल्या वार्षिक संयुक्त राष्ट्रवारीचा ठळक समावेश असला, तरी यंदाची ही भेट निव्वळ भाषणबाजीसाठी नव्हती हे निश्चित. जयशंकर यांनी अमेरिकेचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार जेक सुलिवान आणि परराष्ट्रमंत्री अँटनी ब्लिंकन यांच्याशी प्रदीर्घ चर्चा केली. या भेटीगाठी निव्वळ चीन आणि जागतिक तापमानवाढीवर मतप्रदर्शन आणि मार्गदर्शनासाठी नव्हत्या खास. 'आम्ही त्यांना आमची बाजू सांगितली' अशी कबुलीच जयशंकर यांनी दिली आहे. मुळात निज्जर याच्या हत्येविषयी पहिली ठोस माहिती अमेरिकी गुप्तचर यंत्रणांनीच कॅनडाला पुरवली हे गेल्या आठवड्यात उघड झाले. ट्रुडो यांनी यानंतरच हा विषय प्रथम नवी दिल्लीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याबरोबर खासगी भेटीत आणि नंतर कॅनेडियन पार्लमेंटमध्ये जाहीरपणे मांडला.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# 24 तासांत 24 रुग्णांचा मृत्यू!

## नांदेडच्या जिल्हा शासकीय रुग्णालयातील घटना

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**नांदेडच्या डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात मागील 24 तासांत 24 मृत्यू झाल्याची गंभीर बाब उजेडात आली आहे. कहर म्हणजे या मृतांत 12 नवजात मुलांचा समावेश आहे. रुग्णालयाच्या अधिष्ठातांनी या प्रकरणी बहुतांश मृत्यू बाह्य रुग्णांचा झाल्याचा दावा करत प्रकरणावर पडदा टाकण्याचा प्रयत्न केला.**




### ठाण्यातही घडली होती अशी घटना

उल्लेखनीय बाब म्हणजे ठाण्यातील कळवा रुग्णालयात 36 तासांत 22 जणांचा मृत्यू झाल्याची घटना नुकतीच घडली होती. त्याचे राजकीय पटलावर तीव्र पडसाद उमटले होते. विठ्ठल सायन्ना जिल्हा शासकीय रुग्णालय बांधकामासाठी बंद करण्यात आल्यामुळे तेथील रुग्णांचा अतिरिक्त ताण कळव्यातील छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयावर पडला होता. त्यातून ही घटना घडल्याचा दावा प्रशासनाने केला होता. या प्रकरणी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर चौफेर टीकेची झोड उठली होती.

पण आता घटनेचे गांभीर्य पाहून या प्रकरणाच्या सखोल चौकशीची मागणी होत आहे. यासंबंधीच्या वृत्तानुसार, नांदेडच्या सरकारी रुग्णालयात गत 24 तासांत 24 रुग्णांचा मृत्यू झाला आहे. यापैकी 12 जणांचा मृत्यू सर्पदंश व विषबाधेमुळे झाल्याची माहिती आहे. औषधी व मनुष्यबळाचा तुटवडा ही या मृत्यूमागील प्रमुख कारणे असल्याचा दावा केला जात आहे. या रुग्णालयात नांदेड जिल्ह्यासह लगतच्या परभणी, हिंगोली, यवतमाळ व तेलंगणा भागातील शेकडो रुग्ण येतात. त्यातच ही घटना घडल्यामुळे या भागात मोठी खळबळ माजली आहे. या प्रकरणी रुग्णालयाचे अधिष्ठाता एस आर वाकोडे यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करण्यात आला. पण त्यांनी मृतांमध्ये बाह्य रुग्णांचा सर्वाधिक समावेश असल्याचे स्पष्ट करत या प्रकरणावर पडदा टाकण्याचा प्रयत्न केला. विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे म्हणाले की, नांदेडमध्ये जी रुग्णालयातील घटना घडली आहे. चोवीस तासांत चोवीस लोकांचा बळी गेला. त्यामुळे सरकार आणखी किती लोकांचा जीव घेणार? असा प्रश्न आहे. ठाण्याच्या घटनेनंतर देखील सरकार जागे झाले नाही. अनेक शासकीय रुग्णालयात रुग्णांचा जीव जात आहे. रुग्णांना अजूनही औषधी मिळत नाही. संबंधित घटनेतील लोकांवर त्वरीत कारवाई सरकारने केलीच पाहिजे, मात्र, या सरकारने देखील या घटनेमागचे उत्तर द्यायला हवे, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. मागील 24 तासांत 24 रुग्णांचा मृत्यू झाला. यात 6 मुले व 6 मुली अशा एकूण 12 नवजात मुलांचा समावेश आहे. इतर 12 जणांचा प्रौढ रुग्णांचा समावेश आहे, अशी माहिती अधिष्ठाता एस आर वाकोडे यांनी दिली. प्रस्तुत रुग्णालयात किरकोळ आजारांसह प्रामुख्याने सर्पदंश झालेले रुग्णही मोठ्या संख्येने उपचारासाठी येतात. सर्पदंशावरील औषधी मुंबईच्या हाफकिन संस्थेकडून मागवली जाते. सध्या औषधांचा तुटवडा आहे.

# महाराष्ट्रात जातनिहाय जनगणना होणार?

## भाजप प्रदेशाध्यक्ष बावनकुळे यांचे सूतोवाच!

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**भाजप एक पक्ष म्हणून सत्ताधारी महायुती सरकारकडे ओबीसी जनगणनेची मागणी करणार असल्याचे सूतोवाच भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले आहे. त्यांच्या या विधानामुळे महाराष्ट्रातही बिहारसारखी जातनिहाय जनगणना होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.**



### ओबीसींच्या गणनेची मागणी करणार

आशिष देशमुख यांच्या या विनंतीनंतर चंद्रशेखर बावनकुळे यांनी भाजप एक पक्ष म्हणून शिवसेना, भाजप व महायुतीच्या सरकारकडे ओबीसींची गणना करण्याची मागणी करेल, असे स्पष्ट केले. ते भाजपच्या ओबीसी जागर यात्रेत बोलत होते. बिहारच्या अहवालानंतर आशिष देशमुख यांनी महाराष्ट्र सरकारने ओबीसींची आर्थिक सामाजिक आकडेवारी गोळा करण्याची विनंती केली आहे.

बिहारमधील नितीशकुमार सरकारने जातनिहाय जनगणनेची आकडेवारी जारी केली आहे. त्यामुळे महाराष्ट्रातही अशी जनगणना करण्याची मागणी होत आहे. भाजप नेते आशिष देशमुख यांनी सोमवारी उघडपणे ही मागणी केली. बिहार सरकारने आजच ओबीसींच्या गणनेची आकडेवारी जारी केली. त्यामुळे महाराष्ट्र सरकारनेही अशी जनगणना करण्याची गरज आहे. भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी राज्य सरकारकडे अशी मागणी करावी अशी आम्ही विनंती करतो, असे ते म्हणाले. आशिष देशमुख यांच्या या विनंतीनंतर चंद्रशेखर बावनकुळे यांनी भाजप एक पक्ष म्हणून शिवसेना, भाजप व महायुतीच्या सरकारकडे ओबीसींची गणना करण्याची मागणी करेल, असे स्पष्ट केले. ते भाजपच्या ओबीसी जागर यात्रेत बोलत होते. बिहारच्या अहवालानंतर आशिष देशमुख यांनी महाराष्ट्र सरकारने ओबीसींची आर्थिक सामाजिक आकडेवारी गोळा करण्याची विनंती केली आहे. त्यानुसार भाजप सरकारला असा सर्वे करून त्यासंबंधीची आकडेवारी जारी करण्याची मागणी करेल, असे बावनकुळे म्हणाले. उल्लेखनीय बाब म्हणजे काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी देशात काँग्रेसचे सरकार आल्यानंतर देशभरात जातनिहाय जनगणना करण्याची घोषणा केली आहे. त्यांच्या या भूमिकेमुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील रालोआ सरकारची चांगलीच गोची झाली आहे. विशेषतः मराठा आरक्षणाच्या मुद्यावरून महाराष्ट्रातही ओबीसींची जनगणना करण्याच्या मागणीने जोर धरला आहे. त्यातच नितीशकुमार यांनी जातनिहाय जनगणनेची आकडेवारी जारी केल्यामुळे आता सरकारवर अशी गणना करण्याचा मोठा दबाव वाढला आहे.

# बेदरकारपणामुळे जनतेच्या जीवाशी खेळ!

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

नांदेडच्या शासकीय रुग्णालयात चोवीस तासात नवजात बालकांसह 24 जणांचा मृत्यू झाल्यानंतर राज्यभरात एकच खळबळ उडाली आहे. नांदेड मधील या घटनेवर राज्यभरातून संताप व्यक्त केला जात आहे. विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी या घटनेला सरकारला दोषी मानले. तर आता ठाकरे गटाचे नेते आमदार आदित्य ठाकरे यांनी नांदेडच्या घटनेवरुन सरकारला धारेवर धरले आहे. ते म्हणाले की, वारंवार महाराष्ट्रातल्या जनतेच्या जीवाशी खेळ सुरु आहे. अजून कितीदा पुन्हा पुन्हा हेच घडू देणार? असा सवाल यांनी उपस्थित केला. आदित्य ठाकरे यांनी ट्विटरवर पोस्ट करत सरकारवर निशाणा साधला आहे. नांदेड शहरातील शासकीय रुग्णालयात चोवीस तासात 24 जणांचा मृत्यू झाल्याची धक्कादायक बातमी समजली. त्यात 12 नवजात बालकांचा समावेश आहे हे अधिकच गंभीर आणि हादरवून टाकणारं आहे, असे आदित्य ठाकरे म्हणाले. आदित्य ठाकरे पुढे म्हणाले की, वेळेवर औषध पुरवठा न झाल्याने रुग्णांना जीव गमवावा लागला असं समजतंय. हाफकिनने औषध खरेदी बंद केल्यामुळेच राज्यभरात सरकारी रुग्णालयात औषधांचा तुटवडा भासत आहे. मुंबईत देखील अनेक सरकारी आणि महानगरपालिका रुग्णालयांमधे औषधांची हीच परिस्थिती आहे आणि त्याचे परिणाम राज्यभरातल्या निष्पाप जनतेला भोगावे लागत आहेत. आम्ही ह्या विरुद्ध आवाज उठवला होता, पत्र लिहिलं होतं, KEM रुग्णालयावर मोर्चाही काढला होता. पण मिंधे सरकार ढिम्मच राहिलं असल्याचा आरोप आदित्य यांनी केला. ठाण्यात हेच झालं, आता नांदेडला झालं… दिरंगाई, दुर्लक्ष आणि बेदरकारपणा ह्यामुळे वारंवार महाराष्ट्रातल्या जनतेच्या जीवाशी खेळ सुरु आहे… अजून कितीदा पुन्हा पुन्हा हेच घडू देणार? असा सवालही त्यांनी केला.

# गेहलोत यांनी पराभव स्वीकारला!

## अर्धी काँग्रेस त्यांना हटवण्याच्या प्रयत्नात : पंतप्रधान मोदी

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**चित्तौडगडमधील सणवालिया सेठ मंदिराला भेट दिल्यानंतर आणि 7 हजार कोटी रुपयांच्या प्रकल्पांचे उद्घाटन आणि पायाभरणी केल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काँग्रेसवर जोरदार टीका केली. मेवाडमध्ये भाजपच्या निवडणूक प्रचाराला पुढे नेत ते म्हणाले की, राजस्थानची संस्कृती आपल्या वारशाचा अभिमान बाळगण्यासारखी आहे, परंतु पाच वर्षांच्या काँग्रेस सरकारने राजस्थानची विश्वासार्हता नष्ट केली आहे.**

त्यांनी मोठं आश्वासन दिलं आणि म्हटलं की, सरकार आल्यास राजस्थानमधील प्रत्येक गरीबाला पक्कं छत आणि प्रत्येक घराला नळ कनेक्शन दिले जाईल. भाजप सामूहिक नेतृत्वाखालीच निवडणूक लढवणार असल्याचे स्पष्ट करून ते म्हणाले की, आमचा चेहरा फक्त कमळ आहे. काँग्रेसने खोटे बोलून सरकार निश्चित केले, पण ते चालवता आले नाही, असे मोदी म्हणाले. बसताना, उठताना, झोपताना आणि उठताना मुख्यमंत्री अशोक गेहलोत मुख्यमंत्रांची खुर्ची वाचवण्यात मग्न होते आणि अर्धी काँग्रेस त्यांना खुर्चीवरून हटवण्यात व्यस्त होती. आपल्या मुलाला वाचवण्यात आणि दुसऱ्याच्या मुलाला उखडून काढण्यात ते व्यस्त होते, पण लुटण्याच्या बाबतीत संपूर्ण काँग्रेसमध्ये एकमत होते. इथे गुन्हेगार, दंगलखोर, भ्रष्टाचारी आणि काँग्रेसचे नेते स्वतःला सरकार समजत आहेत, असे सरकार एक दिवसही टिकू नये. मुख्यमंत्री गेहलोतजींना माहित आहे की राजस्थानमध्ये सरकार जाण्याची उलटी गिनती सुरू झाली आहे. दिल्लीत बसलेल्या लोकांवर विश्वास बसणार नाही, पण सरकार जात आहे हे गेहलोतजींना माहीत आहे. त्यामुळे भाजपचे सरकार आल्यानंतर त्यांच्या योजना बंद करू नयेत, अशी विनंती ते करत आहेत. एक प्रकारे त्यांनी भाजपचे अभिनंदन केले आहे. गेहलोतजी तुम्ही पराभव स्वीकारला म्हणून धन्यवाद. तुम्ही प्रामाणिकपणे मान्य केले असेल तर मोदी तुमच्यापेक्षा कितीतरी पटीने जास्त प्रामाणिक आहेत. तुम्ही सुरू केलेल्या लोककल्याणकारी योजना आणखी चांगल्या पद्धतीने करण्यासाठी भाजप सरकार प्रयत्न करेल, अशी ग्वाही मी देतो. ज्यांनी पैसा लुटला, भ्रष्टाचार केला आणि गरिबांना त्रास दिला, त्यांच्यावर नक्कीच कारवाई होईल, ही मोदींची हमी आहे. या लोकांनी मोदींना कितीही शिव्या दिल्या तरी भ्रष्टाचाराविरुद्ध कडक कारवाई सुरूच राहणार आहे. काँग्रेस सरकारची अवस्था अशी आहे की ते जनतेच्या पैशाने आपली तिजोरी भरते आणि जनतेला हतबल करते. भाजप भ्रष्टाचाराच्या तळापर्यंत नक्कीच पोहोचेल. खाण माफियांबद्दल आपण ऐकायचो, पण इथे पेपर लीक माफिया फोफावला आहे. मी तरुणांना खात्री देतो की जे त्यांच्या भविष्याशी खेळतील त्यांना पाताळातही जबाबदार धरले जाईल. त्यांच्यावर कारवाई केली जाईल. या विधानसभा निवडणुकीत एकच चेहरा आहे, तो म्हणजे कमळ. आमचा उमेदवार कमल आहे, त्यामुळे कमल यांना विजयी करण्यासाठी भाजप कार्यकर्त्यांनी एकजुटीने काम करावे. जेव्हा-जेव्हा काँग्रेसला आपण निवडणूक हरणार आहोत असे वाटते तेव्हा ते खोट्या घोषणा करू लागतात. राजस्थानमध्येही असेच प्रयत्न सुरू आहेत. एवढी काळजी होती तर गेल्या पाच वर्षांत कुठे होते, फक्त खुर्ची वाचवत होते.



### आमच्या राजस्थानची बदनामी केली

मी अत्यंत दुःखी मनाने सांगत आहे की, गुन्हेगारीचा विचार केला तर राजस्थान अव्वल स्थानावर येते. अराजकता, दंगली, दगडफेक या बाबतीत आपले राजस्थान बदनाम आहे. काँग्रेसच्या लोकांनाही स्वच्छता कार्यक्रमात अडचणी येतात. महात्मा गांधींच्या जयंतीनिमित्तही कार्यक्रम आयोजित करण्यात त्यांना अडचण येते. महात्मा गांधींचे नाही तर त्यांच्या वाढदिवसाला करा, तुमच्या नाही तर तुमच्या नेत्याच्या वाढदिवसाला करा, त्यांच्या नाही तर तुमच्या मुलांच्या वाढदिवसाला करा. कमिशन मिळत नाही म्हणून काँग्रेस हे काम करत नाही.

# जातनिहाय जनगणना करणारे पहिले राज्य!

## बिहारमध्ये दोन टप्प्यांत जातनिहाय जनगणना

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**बिहार सरकारने आज जातनिहाय जनगणनेची आकडेवारी जाहीर केली. प्रभारी मुख्य सचिव विवेक कुमार सिंह यांनी याबाबत एका पुस्तिकेचे प्रकाशन केले आहे. ते म्हणाले की, बिहारमध्ये 2 कोटी 83 लाख 44 हजार 160 कुटुंबे आहेत. यामध्ये मागासवर्गीय लोकसंख्या 27.12%, अतिमागास 36.01%, अनुसूचित जाती 19.65%, अनुसूचित जमाती 1.68% आणि सर्वसाधारण प्रवर्ग 15.52% आहे.**

बिहारची लोकसंख्या 82 टक्के हिंदू आणि 17.7 टक्के मुस्लिम आहे उपमुख्यमंत्री तेजस्वी यादव यांनी ट्विट केले आहे की, हा ऐतिहासिक क्षण आहे, अनेक दशकांच्या संघर्षाचे हे फळ आहे. कोइरी- 4.2, कुर्मी- 2.8, कायस्थ- .60, मोची,रविदास- 5.2, ब्राह्मण- 3.65, भूमिहार- 2.86, मुसहर- 3.08, राजपूत- 3.45, बनिया- 2.31, मल्लाह- 2.60, यादव- 14.26. पहिला टप्पा : पहिल्या टप्प्यातील जनगणनेला 7 जानेवारीपासून सुरुवात झाली. या टप्प्यात घरांची यादी आणि घरांची मोजणी करण्यात आली. हा टप्पा 21 जानेवारी 2023 रोजी पूर्ण झाला. दुसरा टप्पा : जात जनगणनेचा दुसरा टप्पा 15 एप्रिलपासून सुरू झाला. जो 15 मे रोजी पूर्ण होणार होती. लोकांकडून डेटा गोळा करण्यात आला. दुसऱ्या टप्प्यात कुटुंबांची संख्या, त्यांचे राहणीमान, उत्पन्न इत्यादी माहिती गोळा करण्यात आली. न्यायालयाचा निर्णय येईपर्यंत जात जनगणनेच्या दुसऱ्या टप्प्याचे जवळपास 80 टक्के काम पूर्ण झाले होते. त्यानंतर पाटणा उच्च न्यायालयाच्या हस्तक्षेपानंतर 4 मे रोजी जातनिहाय जनगणना थांबवण्यात आली. पाटणा उच्च न्यायालयाने 1 ऑगस्ट रोजी प्रगणनेविरोधातील सर्व याचिका फेटाळल्या होत्या. सरकार हवे असल्यास जनगणना करू शकते, असे उच्च न्यायालयाने आपल्या आदेशात म्हटले होते. त्यानंतर लगेचच नितीश सरकारने जात जनगणनेचे आदेश जारी केले होते. उच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या आधारे सरकारने सर्व जिल्हाधिकाऱ्यांना जात जनगणनेचे उर्वरित काम पूर्ण करण्याचे आदेश दिले. मुख्यमंत्री नितीश कुमार यांच्या म्हणण्यानुसार, बिहार सरकारला जात जनगणना करायची नसून केवळ लोकांची आर्थिक स्थिती आणि त्यांच्या जातीशी संबंधित माहिती गोळा करायची आहे. जेणेकरून त्यांच्या भल्यासाठी योजना करता येतील.



### दुसऱ्या टप्प्याचे 80 टक्के काम पूर्ण

न्यायालयाचा निर्णय येईपर्यंत जात जनगणनेच्या दुसऱ्या टप्प्याचे जवळपास 80 टक्के काम पूर्ण झाले होते. त्यानंतर पाटणा उच्च न्यायालयाच्या हस्तक्षेपानंतर 4 मे रोजी जातनिहाय जनगणना थांबवण्यात आली. पाटणा उच्च न्यायालयाने 1 ऑगस्ट रोजी प्रगणनेविरोधातील सर्व याचिका फेटाळल्या होत्या. सरकार हवे असल्यास जनगणना करू शकते, असे उच्च न्यायालयाने आपल्या आदेशात म्हटले होते.

# शिवमोगामध्ये ईद मिरवणुकीत दगडफेक!

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

कर्नाटकातील शिवमोग्गा जिल्ह्यात रविवारी ईद-मिलादुन्नबी मिरवणुकीत दगडफेकीची घटना घडली. मीडिया रिपोर्ट्सनुसार, मिरवणुकीत सामील असलेल्या काही बदमाशांनी रागीगुड्डाजवळील शांती नगर भागात एका गटावर दगडफेक केली. यानंतर दोन्ही गटातील लोक रस्त्यावर उतरले. या घटनेत पाच जण जखमी झाले. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पोलिसांनी लाठीचार्ज केला आणि दगडफेकही करण्यात आली.

सध्या शहरात कलम 144 लागू करण्यात आले आहे. पोलिसांनी सांगितले की, 40 जणांना अटक करण्यात आली आहे.

सोमवारी ही माहिती देताना मुख्यमंत्री सिद्धरामय्या म्हणाले की, सध्या जिल्ह्यातील परिस्थिती नियंत्रणात आहे. खबरदारीचा उपाय म्हणून कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. शिवमोग्गा एसपी मिथुन कुमार यांनी वृत्तसंस्था एएनआयला सांगितले की, आम्ही परिस्थिती नियंत्रणात आणली आहे. सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर पसरणाऱ्या अफवांकडे स्थानिक लोकांनी लक्ष देऊ नये. तसेच त्यांची जाहिरात करणे टाळा. भाजप आमदार अश्वत् नारायण यांनी त्यांच्या X हँडलवर शिवमोग्गा शहरात लावण्यात आलेल्या टिपू सुलतान होर्डिंगची छायाचित्रे शेअर करून काँग्रेस सरकारवर निशाणा साधला. त्यांनी लिहिले की, कावेरी समस्या सोडवण्याला प्राधान्य न देणारे काँग्रेस सरकार जातीय दंगलींना प्रोत्साहन देत आहे, हे निषेधार्ह आहे.

शिवमोग्गा येथे प्राचीन टिपूचे कटआउट आणि तलवार कमान बसवण्यास परवानगी देऊन शांततेच्या जातीय उद्यानाचे समाजवाद्यांच्या जागेत रूपांतर करण्यास राज्य काँग्रेस सरकार उघडपणे समर्थन करत आहे.

# अभिनेत्री नव्हे तर हवाई सुंदरी व्हायचं होतं !

टीव्ही मनोरंजन विश्वात आपल्या अभिनयानं ज्या अभिनेत्रीनं मोठी पसंती मिळवली त्या हिना खानची चाहतावर्ग मोठा आहे. ती वेगवेगळ्या रियॅलिटी शो मधील देखील सहभागी झाली होती. त्यातूनही तिला चाहत्यांचा प्रचंड प्रतिसादही मिळाला होता. आज हिनाचा वाढदिवस असून त्यानिमित्तानं तिला चाहत्यांनी शुभेच्छा दिल्या आहेत. हिना ही नेहमीच तिच्या बोल्ड वक्तव्यांमुळे चर्चेत राहिली आहे. कुणीही ट्रोल केल्यास जशास तसे उत्तरं देणाऱ्या हिनानं आता तिच्या स्वप्नांविषयी सांगितलं आहे. तसेच आपल्याला किती मोठ्या संघर्षाला सामोरं जावं लागलं याबद्दल देखील तिनं चाहत्यांना सांगितलं आहे. हिना ही बऱ्याचदा तिच्या सोशल मीडिया अकाउंटवर सक्रिय राहणारी सेलिब्रेटी आहे. ये रिश्ता क्या कहलाता है, मालिकेतून ती सर्वप्रथम प्रेक्षकांच्या भेटीला आला होती. हिनानं तिच्या एका मुलाखतीमध्ये असे सांगितले होते की,तिला अभिनय क्षेत्रात येण्यापूर्वी हवाई सुंदरी होण्यामध्ये फार रस होता. मात्र तिच्या नशिबानं तिला ती संधी दिली नाही. दुसरी गोष्ट म्हणजे तिला पत्रकारिता क्षेत्रातही आवड होती. काही कारणास्तव ते स्वप्नही भंगलं. दिल्लीतून एमबीए करणाऱ्या हिना ही पहिल्यापासूनच महत्वकांक्षी होती. काहीही झालं तरी मोठ्या पदावर काम करायचं ही तिची इच्छा होती. २ ऑक्टोबर १९८७ रोजी हिनाचा जन्म हा श्रीनगरमध्ये झाला. ती एका कश्मिरी कुटूंबातून येते. आज ती टीव्ही मनोरंजन क्षेत्रातील प्रसिद्ध अभिनेत्री आहे. मात्र यापूर्वी तिला अनेक बिकट परिस्थितीचा सामना करावा लागला. असे तिनं काही मुलाखतीतून सांगितले होते. ये रिश्ता क्या कहलाता है, कसोटी जिंदगी की, बिग बॉस ११ सारख्या वेगवेगळ्या शो मधून हिनानं आपली वेगळी ओळख निर्माण केली. हिनानं तिच्या त्या मुलाखतीमधून सांगितलं होतं की, तिला तिच्या दिसण्यावरुन आणि रंगावरुन पहिल्यांदा काम मिळणे कठीण झाले होते. एका प्रोजेक्टमध्ये तिला कश्मिरी मुलीची भूमिका करायची होती मात्र तिला ती कश्मिरी मुलीसारखी दिसत नाही म्हणून रिजेक्ट केले गेले होते. असेही हिनानं सांगितले होते. आता हिना ही ७ मिलियन डॉलर म्हणजे ५५.५ कोटींची मालकीण आहे. वर्षाला ५ कोटी रुपये कमावणारी ती सेलिब्रेटी आहे.



# ऐश्वर्याच्या सौंदर्याला चॅलेंज नाहीच..!

बॉलीवूडमध्ये ऐश्वर्या रॉयच्या नावाची जेवढी चर्चा होते तेवढी क्वचितच आणखी कोणत्या अभिनेत्रीच्या नावाची होत असेल. गेल्या काही दिवसांपासून ऐश्वर्या रॉय ही चर्चेत आली आहे. त्याचे कारण तिनं मणिरत्नम यांचा पीएस १ आणि पीएस २ मध्ये केलेला अभिनय. यामुळे तिच्यावर चाहत्यांनी कौतुकाचा वर्षाव केल्याचे दिसून येते. माजी विश्वसुंदरी असणाऱ्या ऐश्वर्यानं वयाच्या पन्नाशी मध्ये पदार्पण केलं असलं तरी तिचं दिसणं आणि पडदयावर वावरणं ही तिच्या चाहत्यांसाठी आनंदाची पर्वणी असते. आता ती पॅरिसच्या फॅशन वीक २०२३ मध्ये दिसली तेव्हा तिच्याविषयी पुन्हा एकदा चाहत्यांनी भरभरुन प्रतिक्रिया दिल्या आहे. त्यात केवळ ऐश्वर्याच नाही तर तिची भाची नव्या नवेली नंदा देखील होती. त्यांचा रॅम्प वॉकचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. यापूर्वी ऐश्वर्यानं तिच्या लेकीला आराध्याला घेऊन कित्येक सोहळ्यात हजेरी लावली आहे. तेव्हा तिनं फोटोग्राफर्सला पोझ देताना माझ्या लेकीला देखील त्यात थोडं झुकतं माप द्या. अशी लाडिकपणानं तक्रार पापाराझ्झींकडे केली होती. अंबानींच्या एका कार्यक्रमात ऐश्वर्या आणि आराध्या गेली असताना तो प्रसंग घडला होता. आता नव्या नवेली नंदासोबत ऐश्वर्यानं जेव्हा रॅम्प वॉक केलं तेव्हा चाहत्यांचे भान हरपल्याचे दिसून आले आहे. ऐश्वर्यानं सिक्विन गोल्डन गाऊन परिधान केला होता. याशिवाय तिनं डायमंड रिंग्स आणि गोल्डन हिल्सही घातली होती. तिच्या लूकवर आलेल्या प्रतिक्रिया भन्नाट आहे. कित्येकांनी ऐश्वर्याचे कौतुक केले आहे. तुला विश्वसुंदरी का म्हणतात हे तू पुन्हा एकदा सिद्ध केले आहेस. तुम्ही दोघीही खुपच सुंदर दिसता आहात. अशा प्रतिक्रिया नेटकऱ्यांनी दिल्या आहेत. नव्यानं मिनी रेड ड्रेस परिधान केला होता. नव्या ही अमिताभ बच्चन आणि जया बच्चन यांनी लेक श्वेता बच्चनची मुलगी आहे.



# कंगना पायलटची भूमिका साकारणार

कंगना रनोटचा मोस्ट अवेटेड चित्रपट तेजसचा टीझर रिलीज झाला आहे. कंगना एअरफोर्स पायलट बनताना दिसत आहे. टीझरची सुरुवात कंगनाच्या सिक्वेन्सने होते. एअरफोर्स युनिफॉर्ममधला तिचा लूक खूपच दमदार दिसत आहे. कंगना एअरफोर्स पायलट तेजस गिलच्या भूमिकेत आहे. पार्श्वभूमीवर डायलॉग सुरु होतो - जरूरी नहीं हर बार बातचीत होनी चाहिए। जंग के मैदान में अब जंग होनी चाहिए। हो गया है मेरे वतन पर अब बहुत ही सितम.. अब तो आकाश से बारिश नहीं आग बरसनी चाहिए। भारत को छेड़ोगे तो छोड़ेंगे नहीं। टीझरचा बॅकग्राउंड स्कोअर खूपच प्रभावी आहे. पायलटच्या लूकमध्येही कंगना चांगली दिसत आहे. आज गांधी जयंतीनिमित्त या चित्रपटाचा टीझर प्रदर्शित करण्यात आला. या चित्रपटाचा ट्रेलर ८ ऑक्टोबरला प्रदर्शित होणार आहे. रॉनी स्क्रूवालाच्या प्रोडक्शन हाऊस आरएसव्हीपी मुव्हीजच्या बॅनरखाली बनलेला हा चित्रपट २८ ऑक्टोबरला प्रदर्शित होणार आहे.

# बच्चन यांच्यामुळे फ्लिपकार्ट अडचणीत

बॉलीवूड स्टार अमिताभ बच्चन यांनी केलेल्या फ्लिपकार्टच्या जाहिरातीवर स्मार्टफोन किरकोळ विक्रेत्यांनी आक्षेप घेतला आहे. अमिताभ बच्चन यांच्यावर आरोप करण्यात आला आहे की, त्यांनी केलेली जाहीरात खरेदीदारांची दिशाभूल करणारी आहे. त्यामुळे फ्लिपकार्ट कंपनी अडचणीत आली आहे, असे वृत्त द इकॉनॉमिक टाइम्सने दिले आहे. फ्लिपकार्टच्या 'द बिग बिलियन डेज' च्या हिंदी जाहिरातीत अमिताभ बच्चन असे म्हणतात की, फ्लिपकार्ट ज्या प्रकारचे मोबाइल डील ऑफर करत आहे ते किरकोळ विक्रेत्यांकडे मिळणार नाही. ऑल इंडिया मोबाइल रिटेलर्स असोसिएशनने अमिताभ बच्चन यांना पत्र लिहिले आहे. त्या पत्रात म्हणटले की, विविध ऑनलाइन प्लॅटफॉर्म, सोशल मीडिया आणि प्रिंट मीडियावरील जाहिरातींबद्दल आम्ही तीव्र नाराजी व्यक्त करत आहोत. या जाहिराती खोट्या आणि चुकीचा दावा करत आहेत आणि ग्राहकांच्या खरेदी वर्तनावर परिणाम करत आहेत.

# प्रेग्नेंसीच्या रुमर्समध्ये अनुष्का!

अनुष्का शर्मा शनिवारी प्रेग्नेंसीच्या अफवांमध्ये दिसली. अभिनेत्री तिच्या कारच्या पुढच्या सीटवर बसलेली दिसली. यावेळी तिने पांढऱ्या शर्टसह निळ्या डेनिम जीन्सची स्टाइल केली. नुकतीच बातमी समोर आली होती की, विराट-अनुष्का दुसऱ्या मुलाचे पालक होणार आहेत. मात्र, आतापर्यंत या बातमीवर अनुष्का किंवा विराटकडून कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया आलेली नाही.

अनुष्कासोबतच तिच्या फोननेही लोकांचे लक्ष वेधून घेतले आहे. वास्तविक, व्हिडिओमध्ये, अनुष्का वनप्लस ओपन फोन हातात धरताना दिसत आहे, जो या ब्रँडचा पहिला फोल्डेबल फोन आहे. या फोनची किंमत जवळपास 1.2 लाख रुपये आहे. मात्र, तो अद्याप भारतीय बाजारपेठेत लॉंच झालेला नाही. मीडिया रिपोर्ट्सवर विश्वास ठेवला तर हा फोन 20 ऑक्टोबरला लॉन्च होईल. व्हिडिओ पाहिल्यानंतर सोशल मीडिया यूजर्स म्हणत आहेत की, अनुष्का जाणूनबुजून या फोनचे मार्केटिंग करत आहे. काही लोक कमेंट सेक्शनमध्ये गरोदरपणाबाबत प्रश्न विचारत आहेत.



# एशियाडच्या 9व्या दिवशी भारताला 7 पदके!

## » 400 मीटर मिश्र रिले संघाचे कांस्य रौप्यपदकात अपग्रेड

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**19व्या आशियाई क्रीडा स्पर्धेच्या नवव्या दिवशी भारतीय खेळाडूंनी दमदार कामगिरी केली. भारतीय खेळाडूंनी सोमवारी 7 पदके जिंकली. यापैकी 5 पदके खेळाडूंनी जिंकली. चीनमधील हांगझोऊ येथे सोमवारच्या खेळांच्या शेवटी तेजस्वीन शंकर 4260 गुणांसह डेकॅथलॉनमध्ये आघाडीवर आहे. तत्पूर्वी, 400 मीटर मिश्र रिले संघाचे कांस्यपदक श्रीलंकेचा संघ अपात्र ठरल्यानंतर रौप्यपदकावर श्रेणीसुधारित झाले.**



सकाळी स्केटर्सना 2 कांस्यपदक मिळाले. त्यानंतर दुपारपर्यंत तिने टेबल टेनिसच्या महिला दुहेरीत कांस्यपदक मिळवले. त्यानंतर सायंकाळी ॲथलेटिक्स स्पर्धा सुरू झाल्या. महिलांच्या 3000 मीटर स्टीपलचेस स्पर्धेत पारुल चौधरीने रौप्य आणि प्रितीने भारतासाठी कांस्यपदक जिंकले. पारुलने ही शर्यत 9 मिनिटे 27.63 सेकंदात पूर्ण केली. प्रितीने 9 मिनिटे 43.32 सेकंदात शर्यत पूर्ण करून कांस्यपदक जिंकले. प्रथम स्थान बहरीनच्या यावी विनफ्रीड मुतिलने पटकावले, ज्याने 9 मिनिटे 18.28 सेकंदात शर्यत पूर्ण केली. भारताच्या मुहम्मद अनस, जिस्ना मॅथ्यू, ऐश्वर्या मिश्रा, सोनिया बैश्य, मुहम्मद अजमल यांनी मिश्र रिलेमध्ये कांस्यपदक जिंकले. संघाने 3 मिनिटे 14.34 सेकंदात शर्यत पूर्ण केली. भारतीय चौकडीने शर्यतीत तिसरे स्थान पटकावले, पण दुसऱ्या क्रमांकावर असलेला श्रीलंकेचा संघ अपात्र ठरला. यामुळे भारताचे कांस्यपदक रौप्यपदकात बदलले . हॉकीमध्ये भारतीय पुरुष संघाने उपांत्य फेरीत धडक मारली आहे. संघाने शेवटचा गट सामना बांगलादेशविरुद्ध खेळला आणि 12-0 असा विजय मिळवला. भारताकडून हरमनप्रीत सिंग आणि मनप्रीत सिंग यांनी प्रत्येकी 3 गोल केले.

तर अभिषेकने दोन गोल केले. अमित रोहिदास, ललित उपाध्याय, नीलकांत शर्मा आणि गुरजंत सिंग यांनी प्रत्येकी 1 गोल केला. भारतीय पुरुष हॉकी संघ एशियाडमध्ये अपराजित आहे. संघाने सर्व गट सामने जिंकले. भारतीय खेळाडूंनी सर्व 4 पुरुष आणि महिला कंपाऊंड स्पर्धांमध्ये प्री-क्वार्टरफायनल नॉकआउट सामने जिंकले. अभिषेक वर्माने बेलाल अयमान अलवाडी (सौदी अरेबिया) 147-139, ओजस देवतळेने अहमद अलशट्टी (कुवेत) 148-138 असा, ज्योती सुरेखा वेण्णमने श्रीलंकेच्या अनुराधा करुणारत्नेचा 145-132 असा पराभव केला आणि आदिती गोपीचंद स्वामीने 147-139 असा पराभव केला. महिलांच्या 400 मीटर हर्डल्समध्ये, विथ्या रामराजने 1984 मध्ये पीटी उषाच्या 400 मीटर हर्डल्सच्या राष्ट्रीय विक्रमाची बरोबरी केली. पहिल्याच हीटमध्ये विठ्या रामराज अव्वल ठरली. तिने ही शर्यत 55.42 सेकंदात पूर्ण केली. त्याचवेळी पीटी उषाने लॉस एंजेलिस ऑलिम्पिकमध्ये राष्ट्रीय विक्रम केला होता. पुरुष एकेरीच्या 64 व्या फेरीत किदाम्बी श्रीकांतने व्हिएतनामच्या डक फेट पाचव्याचा 2-0 असा पराभव केला.

किदांबीने हा सामना 21-10, 21-9 असा जिंकला.पुरुष दुहेरीच्या 32व्या फेरीत सात्विक-चिराग जोडीने बाजी मारली. त्याने हाँगकाँगच्या हिन लाँग-चुन वाईचा 2-0 (21-11, 21-16) असा पराभव केला. साई प्रतीक आणि तनिषा क्रेस्टो या जोडीने मिश्र दुहेरीच्या 32 व्या फेरीत बाजी मारली आहे. त्यांनी मकाऊ, चीनच्या जोडीचा 2-0 असा पराभव केला. मिश्र दुहेरीच्या 32व्या फेरीत रोहन कपूर आणि सिक्की रेड्डी या जोडीला सामना पूर्ण करता आला नाही. रोहन कपूर आजारपणामुळे निवृत्त झाला, त्यामुळे मलेशियाच्या संघाला वॉकओव्हर देण्यात आला. पुरुष दुहेरीच्या 32व्या फेरीत अर्जुन रामचंद्रन आणि ध्रुव कपिला या जोडीला माघार घ्यावी लागली. यामुळे जपानी जोडीला वॉकओव्हर मिळाला. पुरुषांच्या 200 मीटर अंतिम शर्यतीत भारताच्या अमलान बोरगोहेनने 20.98 सेकंद वेळेसह सहावे स्थान पटकावले, तर जपानच्या कोकी उयामाने सुवर्णपदक जिंकले.

### भारतीय खेळाडूंची दमदार कामगिरी

» भारतीय खेळाडूंनी 8व्या दिवशी दमदार कामगिरी केली. रविवारी भारतीय खेळाडूंनी 3 सुवर्ण, 7 रौप्य आणि 5 कांस्य अशी एकूण 15 पदके जिंकली. खेळाडूंनी देशासाठी 2 सुवर्णांसह एकूण 9 पदके जिंकली, तर नेमबाजांनी आणखी 3 पदके जिंकली. या दिवशी भारताने पुरुषांच्या सापळ्यात, 3000 मीटर स्टेपल चेस आणि शॉट पुट इव्हेंटमध्ये सुवर्ण जिंकले. नेमबाजांनंतर, युवा ॲथलीट अविनाश साबळे याने 3000 मीटर स्टीपलचेस स्पर्धेत गेम्स रेकॉर्डसह सुवर्ण जिंकले. त्याने इराणच्या होसेनीचा (8 मिनिटे 22.79 सेकंद) विक्रम मोडला. यानंतर तजिंदर पाल सिंग तूरने शॉटपुटमध्ये या गेम्सचे सुवर्ण जिंकले. शेवटच्या प्रयत्नात तो पहिल्या क्रमांकावर आला.

# रिक्षा चालकाच्या मुलीने केली ऐतिहासिक कामगिरी!

## » आई-वडिलांच्या प्रोत्साहनाने ॲन्सी सोजन झाली ॲथलीट

नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज

**हांगझाऊ आशियाई क्रीडा स्पर्धेत भारतीय खेळाडूंची ॲथलेटिक्समध्ये उत्कृष्ट कामगिरी सुरूच आहे. भारताच्या ॲन्सी सोजनने महिलांच्या लांब उडीत दुसरे स्थान मिळवून रौप्य पदक जिंकले. तिने अंतिम फेरीत ६.६३ मीटरची सर्वोत्तम उडी मारून रौप्यपदक जिंकले. ती पहिल्या स्थानावर असलेल्या चीनच्या शिकी झिओंगपेक्षा १० मीटर मागे होती.**

लांब उडीच्या अंतिम फेरीसाठी सहा प्रयत्न असतात आणि त्यातील सर्वोत्तम प्रयत्नांवर पदक निश्चित केले जातात.सोजनचा पहिला प्रयत्न ६.१३ मीटर होता. यानंतर तिने ६.४९ मीटर उडी मारली. तिसऱ्या प्रयत्नात सोजनने त्यात सुधारणा करत ६.५६ मीटर उडी मारली. चौथ्या प्रयत्नात तिला ६.३० मीटर उडी मारता आली. पाचव्या प्रयत्नात सोजनने आपली सर्व शक्ती पणाला लावत ६.६३ मीटर उडी मारून रौप्यपदक मिळवले. तिने सहाव्या प्रयत्नात सुवर्णपदक मिळवण्यासाठी उडी मारली, पण तिची उडी फाऊल झाली. त्याचवेळी सुवर्ण जिंकणाऱ्या चीनच्या शिकीचे सहा प्रयत्न पुढीलप्रमाणे; ६.६२ मीटर, ६.६० मीटर, ६.७३ मीटर, ६.६२ मीटर, ६.६२ मीटर आणि ६.३३ मीटर. भारताची आणखी एक ॲथलीट, शैली सिंग हिने ६.४८ मीटरच्या



सर्वोत्तम प्रयत्नासह या स्पर्धेत पाचवे स्थान पटकावले. हाँगकाँगच्या यान यू एन्गाने ६.५० मीटरच्या सर्वोत्तम प्रयत्नासह कांस्यपदक जिंकले. महिलांच्या लांब उडी प्रकारातील भारताचे हे आठवे पदक आहे. आतापर्यंत या स्पर्धेत भारताला फक्त एक सुवर्णपदक मिळाले आहे, जे अंजू बॉबी जॉर्जने २००२ बुसान आशियाई क्रीडा स्पर्धेत जिंकले होते.

सोजन व्यतिरिक्त, नीना वरकिलने २०१८ जकार्ता आशियाई क्रीडा स्पर्धेत रौप्यपदक जिंकले, अंजू बॉबीने २००६ दोहा आशियाई क्रीडा स्पर्धेत रौप्यपदक जिंकले, मर्सी कुट्टनने १९८२ दिल्ली आशियाई क्रीडा स्पर्धेत रौप्यपदक जिंकले आणि एंजल मेरी जोसेफने १९७८च्या बँकॉक आशियाई क्रीडा स्पर्धेत रौप्यपदक जिंकले. क्रिस्टीन फोरेजने १९६६च्या बँकॉक आशियाई खेळांमध्ये कांस्यपदक जिंकले आणि सिल्व्हियाने १९५१च्या दिल्ली आशियाई क्रीडा स्पर्धेत कांस्यपदक जिंकले. ६.६३ मीटरची उडी ही सोजनची वैयक्तिक सर्वोत्तम उडी आहे. ही २२ वर्षीय ॲथलीट केरळमधील त्रिशूरची रहिवासी आहे.

### सात मीटरचा टप्पा गाठण्याचे स्वप्न

» लांब उडीत सात मीटरच्या जादुई आकड्याला स्पर्श करण्याचे सोजनचे स्वप्न आहे. त्याच्यासाठी, तिचे पालक आणि प्रशिक्षक कन्नन मॅश हे खूप मेहनत घेत आहेत कारण तिच्यामते, तिच्या आयुष्यातील सर्वात प्रभावशाली लोक आहेत. ब्राझीलचा फुटबॉल स्टार नेमार आणि जमैकाचा माजी महान ॲथलीट उसेन बोल्ट हे सोजनचे आवडते खेळाडू आहेत. २०१९ मध्ये पंजाबमधील संगरूर येथे झालेल्या राष्ट्रीय शालेय संमेलनात सोजनला मुलींमध्ये सर्वोत्कृष्ट धावपटू म्हणून गौरविण्यात आले. ती सध्या त्रिशूर येथील सेंट थॉमस कॉलेजची विद्यार्थिनी आहे.